# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ८५ बुधवार दि.०८ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१,६२८ कोटींचे पॅकेज-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत

मुंबई :- राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. यामध्ये २९ जिल्हे प्रभावित झाले आहेत. या जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त २५३ तालुके आणि २०५९ मंडळांमध्ये मदतीसाठी ६५ मिलीमिटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नुकसानग्रस्त भागातील बळीराजाला पुन्हा उभे करण्यासाठी ३१ हजार ६२८ कोटींच्या मदतीचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले. या पॅकेजनुसार कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टरी १८ हजार ५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी २७ हजार रुपये तर बागायतीसाठी प्रति हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. जाहीर करण्यात आलेली मदत दिवाळीपूर्वी देण्याचा प्रयत्न राहणार असून ही आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी देऊ केलेल्या मदतीची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसह पिके, जनावरे, गोठे, दुकाने, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही जणांचे मृत्यूही झाले आहेत. मंत्रिमंडळातील सदस्यांनी काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन नुकसानग्रस्तांना तातडीची १० हजार रुपयांची मदत, गहू, तांदूळ आदी देण्यात आले. यासाठी २२०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता तातडीने मंजूर करण्यात आला. विमाधारक शेतकऱ्यांना लवकर मदत मिळवून देण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान स्वत: प्रयत्न करीत असून विमाधारकांव्यतिरिक्त इतर शेतकऱ्यांनाही १७ हजार रुपये प्रति हेक्टरी इतकी रक्कम दिली जाणार आहे. या भरपाईसाठी १८ हजार कोटींहून अधिकची तरतूद केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात एक कोटी ४३ लाख ५२ हजार २८१ हेक्टर क्षेत्रावर पीक लागवड झाली. त्यापैकी ६८ लाख ६७ हजार ७५६ हेक्टर क्षेत्रावर अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. ज्या ठिकाणी घरांचे नुकसान झाले, तिथे नव्याने घरे बांधण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मदत करण्यात येणार आहे, तर डोंगरी भागात घरे बांधण्यासाठी अतिरिक्त १० हजारांची मदत देण्यात येईल. तसेच ज्या दुकानांचे नुकसान झाले असेल त्यांना ५० हजार रुपये, मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांसाठी तीन जनावरांची अट न ठेवता प्रति जनावर ३७ हजार ५०० रुपये तर १०० रुपये प्रति कोंबडी अशी भरपाई देण्यात येईल. जमीन खरडून गेलेली शेती पुन्हा लागवडीयोग्य होण्यासाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टरी थेट मदत तर तीन लाख रुपये मनरेगा मधून दिले जातील. बाधित विहिरींसाठी विशेष बाब म्हणून प्रति विहीर ३० हजार रुपये देण्यात येतील. त्याचप्रमाणे मत्स्यशेती तसेच बोटींच्या नुकसान भरपाईसाठी १०० कोटींची तरतूद केल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना मदत देताना ग्रीस्टॅकमधील माहिती ग्राह्य धरली जाईल. त्यासाठी कुठलीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी १० हजार कोटी रुपये, तसेच पूरग्रस्तांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील पाच टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या माध्यमातून १५०० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या भागात टंचाई परिस्थितीत लागू असलेल्या सर्व सवलती ओली टंचाई समजून लागू करण्यात येणार आहेत. बळीराजा वीज सवलत योजनेमुळे कृषी पंपांना आधीच वीज देयक माफ केले आहे, त्यामुळे वीज देयकाची वसूली होणार नाही. या अभूतपूर्व संकटात मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मोठ्या प्रमाणात मदत येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले अनेकांनी सामाजिक उत्तरदायित्व निधी देण्याचेही मान्य केले. जी मदत नियमांमध्ये बसणार नाही अशा प्रकरणी मुख्यमंत्री सहायता निधीमधून देण्यात येईल. पुरामुळे कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आवर्जून सांगितले.

**संकट काळात बळीराजाच्या मदतीसाठी शासन तत्पर- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

अस्मानी संकटामुळे खचलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. पूरग्रस्त भागात नुकसानीसाठी तातडीची



१० हजाराची मदत देण्यात आली आहे. अशा संकट काळात अन्नदाता बळीराजाच्या मदतीसाठी शासन धावून आले आहे. सर्व अटी - शर्ती बाजूला ठेवत शेतकरी हिताला शासनाचे प्राधान्य असून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासन तत्पर आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यात ६५ लाख हेक्टर जमिनीवर शेतीचे नुकसान झाले आहे. जमीन खरडून गेल्यामुळे भविष्यात पीक घेण्याचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. मात्र शेतकऱ्यांनी काळजी करायची गरज नसून शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. पूरग्रस्त भागातील नागरिकांना पुन्हा उभे करण्यासाठी शासन सर्व उपाययोजना करीत आहे. खरडून गेलेल्या जमिनींना प्रति हेक्टरी ४७ हजार रूपये मदत देण्यात येणार आहे. तसेच मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना) मधून तीन लाख रूपये प्रति हेक्टरी देण्यात येतील. रब्बीच्या हंगामासाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १० हजाराची मदत मिळणार आहे. केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर झाल्यानंतर केंद्रही शेतकऱ्यांना मदत करणार आहे. केंद्र शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकरी सन्मान योजनेतून मदत करीतच आहे. राज्य शासनही नमो शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून वार्षिक सहा हजार रूपयांची मदत देत आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला पुन्हा उभे राहण्यास निश्चितच मदत मिळणार असल्याची खात्रीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

**एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना तीन हेक्टरपर्यंत मदत-उपमुख्यमंत्री अजित पवार**

राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीमुळे शेतकरी चिंताग्रस्त असून त्याच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त प्रत्येक शेतकऱ्याला मदत करण्याची शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे दोन हेक्टरपर्यंत मदतीचे निकष बाजूला ठेवून तीन हेक्टरपर्यंत मदत करण्यात येणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

पावसामुळे आलेल्या पुरात शेतजमिनी खरडून गेल्या ओहत. अनेक शेतकऱ्यांची जनावरे मृत पावली असून गोठ्यांचेही नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी शासन पॅकेजच्या माध्यमातून भरीव मदत करीत आहे. या मदतीपासून कुणीही वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे. तरीही कुणी मदतीपासून राहून गेले असल्यास त्यांनाही निश्चित मदत करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**असे आहे पॅकेज**

मृतांच्या कुटुंबीयांना: ४ लाख प्रत्येकी, जखमी व्यक्तींना : ७४ हजार रुपये ते २.५ लाख रुपये, घरगुती भांडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रति कुटुंब, कपडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रतिकुटुंब, दुकानदार, टपरीधारक: ५० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट पक्क्या घरांना : एक लाख २० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट कच्च्या घरांना : एक लाख ३० हजार रुपये, अंशतः पडझड: ६,५०० रुपये, झोपड्या: आठ हजार रुपये, जनावरांचे गोठे: तीन हजार रुपये, दुधाळ जनावरे: ३७,५०० रुपये, ओढकाम करणारी जनावरे: ३२ हजार रुपये, कुक्कुटपालन: १०० रुपये प्रति कोंबडी. निकषापेक्षा अधिकची मदत देण्यासाठी १० हजार कोटी रुपये अतिरिक्त, खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर थेट मदत आणि मनरेगाअंतर्गत तीन लाख रुपये प्रतिहेक्टर, खचलेली किंवा बाधित विहीर: ३० हजार रुपये प्रति विहीर, तातडीच्या मदतीसाठी १५०० कोटी रुपये जिल्हा नियोजन निधीमध्ये राखीव.

**दुष्काळी सवलती लागू**

जमीन महसुलात सुट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेती कर्ज वसुलीला स्थगिती, शाळा, महाविद्यालय परीक्षा शुल्कात माफी, रोहयो कामात शिथिलता, शेती पंपाची वीज जोडणी खंडित न करणे.

# समाजभूषण उत्तमराव तरकसे शेतकऱ्यांच्या बांधावर

बीड:- मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात असणारे अंजनडोह रुई उंबरेवाडी आसरडोह मोहखेड अशा काही गावातील शेतकऱ्यांच्या बांधावर समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे (महाराष्ट्र शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) हे त्यांच्या शासकीय कामातून वेळात वेळ काढून जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाच्या शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन यावर्षी झालेल्या आसमानी पावसाच्या पुराच्या पाण्याने अक्षरशा शेत जमीनीतील माती चाटून गुडघा एवढे पिकास सह माती खचून गेलेली आहे तसेच काही गावांच्या रस्त्याचे पूल व रस्ते वाहून गेल्याने संपर्क सुद्धा तुटलेला आहे





संसार सुद्धा काही शेतकऱ्यांचा वाहून गेलेला आहे अशा संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना माणुसकीचा ओलावा आणि शब्दांचा आधार धीर देण्याकरिता त्यांच्या व्यथा ऐकून घेण्याकरिता व आसमानिक पावसाच्या संकटाने झालेल्या नुकसानीचे पाहणी करण्याकरिता सदर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष त्यांच्याच तोंडून त्यांची झालेली दैनीय अवस्थेची करून काहाणी ऐकुन कोणाचेही हृदय पिळवटून टाकणारी व्यथा ऐकून पाहून समाजभूषण तरकसे हे सुद्धा अगदी व्यतीत होऊन यांनी या जगाच्या पोशिंदाला बळीराजाला शासनाने भरीव आसी मदत करून त्यांचे संसार उभे करावेत जेणेकरून पुढे चालून तेच जगाचे पोशिंदे जगाला सावरू शकतील असे सरकार मायबापायांनी भरीव आसी मदत करावी अशी विनंती करत आहेत

# आयटीआय परीक्षेत देशात दुसरी आलेली रेणापूरची कन्या कु. मदिया सय्यद हिचे आ. कराड यांच्याकडून अभिनंदन

लातूर : - अखिल भारतीय व्यवसाय प्रशिक्षण (आयटीआय) तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत रेणापूर येथील स्वातंत्र्य सैनिक मुर्गाप्पा खुमसे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विजतंत्री विभागात रेणापूर येथील कु. मदीया खदीर सय्यद या विद्यार्थिनीने ९९.६६ टक्के गुण घेऊन देशात द्वितीय क्रमांक मिळविला. या यशाची दखल घेऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या हस्ते नुकताच गौरव करण्यात आला. अत्यंत अभिमानास्पद मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी कु. मदीया खदीर सय्यद या विद्यार्थिनीचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.



कु. मदीया खदीर सय्यद या विद्यार्थिनीचे वडिल बांधकाम कामगार आहेत. घरची परिस्थिती अगदी जेमतेम असून अशा प्रतिकूल परिस्थितीत या विद्यार्थिनीने चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आपले आयटीआय मधील विजतंत्रीचे शिक्षण पूर्ण केले. कौशल्य रोजगार व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांनी या गुणवंत विद्यार्थीनीस दिल्ली येथे झालेल्या चौथ्या दिक्षांत समारंभात कु. मदिया हिला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. हा गौरव केवळ विद्यार्थिनीचा नसून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाबरोबरच संपूर्ण लातूर जिल्ह्याचा अभिमान वाढविणारा आहे. कु. मदीया खदीर सय्यद तिने प्राप्त केलेल्या घवघवीत यशाबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कु. मदीया सय्यद या विद्यार्थिनीचे वडील खदीर सय्यद, चुलते आजम सय्यद, सय्यद मुसा जमाल, आई सय्यद शाहीन खदीर यांच्यासह रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे शहराध्यक्ष अच्युत कातळे, दत्ता सरवदे, उज्वल कांबळे, चंद्रकांत कातळे, मनीषा मुंडे, महेश गाडे, शेख शफीयोद्दीन, राजकुमार आलापुरे, शेख अजीम, रफिक शिकलकर, शेख खुद्दुस, मारूफ अत्तार, रमेश वरवटे, संतोष राठोड, नंदकिशोर बंडे, मनोज चक्रे, राम दत्त, लतीफ मुल्ला, सचिन सिरसकर, सूर्यकांत कुडके यांच्यासह इतर अनेक जण होते.

# शासन मातंग समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध - मंत्री अतुल सावे







छ.संभाजी नगर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र शासन मातंग समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक ऊर्जा विभागाचे मंत्री मा.ना.अतुल सावे यांनी केले फकिरा ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या वतीने दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी शिव छत्रपती महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे शासनाच्या साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीच्या वतीने प्रकाशित खंडाचे मोफत वाटप मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमात, गुणवंत विद्यार्थ्यांचा, साहित्यिक, निवृत्त अधिकारी, कर्मचारी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे समाज भूषण पुरस्कार प्राप्त ,ज्यांना पदोन्नतीमिळाली आहे अशा अधिकारी/ कर्मचारी, साहित्यिक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला या प्रसंगी भाजपाचे जिल्हा शहराध्यक्ष श्री. किशोर शितोळे,विश्व हिंदू परिषदेचे देवगिरी प्रांताध्यक्ष प्रा.संजय गायकवाड, डॉ. एन.जी.कलवले उपस्थित होते,सावे पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस यांनी अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाला भरभरून निधी दिला आहे, पुण्यातील क्रांतीगुरू लहुजी साळवे यांच्या स्मारकासाठी शंभर कोटी रुपये मंजूर केले आहेत या समाजाची अनेक वर्षांपासून 'अर्टी' ची मागणी मान्य करून पन्नास कोटी रुपये निधी दिला आहे, तसेच अनुसूचित जातीच्या आरक्षणात लवकरच अबकड अशी वर्गवारी करून समाजाला न्याय दिला जाणार आहे अशी माहिती देऊन अण्णाभाऊ साठे यांचे सर्व साहित्य लाखो रुपये खर्च करून प्रकाशित केले आहे.या वेळी श्री.किशोर शितोळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले, भाजपा समाजाच्या विकासासाठी सतत प्रयत्न करीत आहे ,त्यामुळे समाजाने शासनाच्या पाठीमागे उभे राहायला पाहिजे, फकिरा ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय शिंदे यांनी शासनाने अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे अकरा खंड प्रकाशित केले असून त्यांची किंमत अत्यंत अल्प ठेवली आहे. म्हणून सामान्यांना सहज विकत घेता येतात यामध्ये शासनाचे खूप मोठे योगदान राहिले आहे. या कार्यक्रमात डॉ.दिगंबर नेटके, दिगंबर मन्यार, प्राचार्य डॉ हनुमंत मिसाळ, अविनाश साठे, पंचशीला भालेराव, संजय विरूळे, नामदेव गायकवाड, मच्छिंद्र पुलावळे, शांताबाई हनवते, रामदास गायकवाड,इ.अण्णाभाऊ साठे समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला, तसेच कोमल आरे, क्रांती आरसूड, सुंदर कसबे, एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल प्रतिभा समुखराव,अरूण कांबळे यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल,अमित पवार, शिवानी आढागळे नेट सेट उत्तीर्ण झाल्याबद्ल,पुनम शिंदे, रूपाली सगट विशेष प्राविण्य मिळवल्याबदल तर ऋतुजा शिंदे हिने एफ.एम.जी.ई.ही परीक्षा उत्तीर्ण केल्यामुळे सत्कार करण्यात आला.याच कार्यक्रमात प्रा.विजय कुमठेकर, राजू कसबे, राजेंद्र मोरे, क्रांतीकारी शेतकरी संघटना यांचाही सत्कार करण्यात आला या कार्यक्रमात उपस्थित असलेले जेष्ठ साहित्यिक डॉ.विठ्ठल भंडारे यांचाही सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र लोदगेकर यांनी केले,सूत्रसंचालन डॉ.शोभा हानवते यांनी केले तर आभार प्रा.बी.आर.पारसकर यांनी मानले

## संपादकीय

# महाराष्ट्राचा कौल पुन्हा समोर येणार!

महाराष्ट्राचा कौल पुन्हा एकदा समोर येणार आहे. २०१९ मध्ये एकत्र निवडून आलेले लोक वेगळे झाले आणि महाराष्ट्राच्या राजकारणातले सगळेच बदलले आहे. आता तीन पक्ष इकडे आणि तीन पक्ष तिकडे, अशी स्थिती आहे. त्यातल्या प्रत्येकालाच वाढायचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लवकरच होणार्‍या निवडणुकांत ‘पळा पळा कोण पुढे पळे तो’ असे होणार आहे. प्रत्येकालाच स्वबळावर पुढे जायचे आहे आणि त्यासाठी या स्थानिक निवडणुका कमालीच्या महत्त्वाच्या झाल्या आहेत.

मृणालिनी नानिवडेकर संधीच्या शोधात कार्यकर्ते मंडळी सध्या मुंबईत नेत्यांचे उंबरठे झिजवण्यासाठी गर्दी करताना दिसत आहे. या प्रत्येकालाच मोठे व्हायचे आहे आणि मोठे होण्यासाठी निवडणुकांमध्ये जिंकणे हा एक अतिशय महत्त्वाचा मार्ग राजकीय पक्षांना सापडला असल्यामुळे कार्यकर्तेही त्याच वाहत्या गंगेत हात धुऊन घेत आहेत. खरे तर २०१४ मध्ये भाजप आणि शिवसेनेची युती तुटली. ते स्वतंत्रपणे विधानसभेला सामोरे गेले तेव्हापासूनच कोणी कोणत्याही पक्षातून उडी मारून दुसर्‍या पक्षातून तिकीट मिळवण्याच्या स्पर्धेत उतरला आहे. या स्पर्धेमध्ये कोण पुढे जाईल ते सांगता येत नाही; मात्र ‘जो जीता वहीं सिकंदर’ या नात्याने निवडणुकीचे फळ जिंकण्याच्या तयारी सध्या सर्वजण आहेत. या स्पर्धेत साम–दाम–दंड–भेदासारखेच ‘वशीकरण विद्ये’ला फार जास्त महत्त्व आलेले असते, त्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांना आपणच कसे जिंकतो हे सांगण्याची रस्सीखेच स्थानिक आणि वरच्या पातळीवरच्या कार्यकर्त्यांमध्ये लागलेली आहे.

नेते जर वैचारिक उड्या मारून पुढे जाऊ शकतात, पक्षदेखील वैचारिक भूमिका बाजूला ठेवून युती करू शकतात, तर आपण बाजूला कशाला राहायचे, असेही एक नवीन धोरण अनेक पक्षांनी आत्मसात केलेले दिसते. येत्या काही दिवसांत आचारसंहिता लागू होईल. आचारसंहिता लागू झाली की, तिकीटवाटपासाठी आपण पुढे कसे जाऊ शकू, यासाठी जोरदार स्पर्धा सुरू झाली आहे. तिकीट मिळवण्यासाठी आपण वाटेल तितका खर्च करू शकतो, असे सांगणार्‍यांची फौजदारी कमी नाही, ही महाराष्ट्राची नवीन संस्कृती झाली आहे. आपापसातील भांडण मिटवून भाऊ एकत्र येत असतील, तर आम्ही तर सामान्य कार्यकर्ते आहोत, संधी मिळत असेल तर तिचे सोने करण्याचा प्रयत्न करण्यास काय हरकत आहे, असा मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात सक्रिय झाला आहे. या वर्गाला जनतेचे सेवक म्हणावे की संधिसाधू, असा प्रश्नदेखील विचारणे विद्यमान वातावरणात शक्य नाही. प्रत्येकाचे आपापले इलेक्टिव्ह मेरिट सांगायचे प्रयत्न सुरू आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर मुंबईची समीकरणे बदलतील आणि या संभाव्य युतीचा नाशिक, ठाणे आणि मराठवाड्यातल्या काही जिल्हा परिषदांमध्ये परिणाम होऊ शकतो.

मात्र, दोघे भाऊ एकत्र आले तर काँग्रेस महाविकास आघाडीतून बाहेर पडेल, असेही सध्याचे चित्र आहे. अल्पसंख्याक मतदार शिवसेनेकडे वळल्यामुळे काँग्रेसमध्ये काहीशी अस्वस्थता आहे. तर पुढे काय, हा प्रश्न भेडसावत असल्यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ वेगळा डाव मांडण्याच्या तयारीत आहेत. त्यांच्या प्रस्तावाला दिल्ली काहीशी अनुकूल असल्याचेही बोलले जात आहे. काँग्रेसची मतसंख्या संपूर्ण महाराष्ट्रात दखल घेण्याजोगी आहे. कार्यकर्त्यांना निवडणुकीत लढायची संधी दिली तरच ते पक्षात राहतील, पक्षाच्या मधल्या फळीचा दिल्लीला निरोप आहे. लढायला संधी मिळाली तर काँग्रेसचे नेते लोकशाही प्रक्रियेत पुढे जातील आणि महाराष्ट्र राज्यात काँग्रेस आगामी काळात मजबूत होऊ शकेल, असेही सांगितले जाते आहे. काँग्रेस आघाडीतून काही ठिकाणी बाहेर पडले तर त्या जागी अर्थातच नव्या संधी निर्माण होतील. याचा शोध केवळ शिवसेना ‘उबाठा’तील स्थानिक नेतेच घेत आहेत असे नाही, तर सध्या सत्ताधारी महायुतीत असलेल्या काही असंतुष्ट; पण संधीच्या शोधात असलेल्या नेत्यांनाही तिथे उडी मारायची संधी मिळेल. केवळ तिकीट मिळणे हा सध्याचा धर्म झाला आहे आणि तीच सध्याची नीती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार या गटाचे बहुतांश कार्यकर्ते आणि खासदार, आमदारही सध्या स्वतःच्या भूमिका तपासून पाहत आहेत. सत्तेपासून दूर राहायची या पक्षाला सवय नाही, त्यामुळे जिल्हा परिषदा आणि विशेषतः नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये या पक्षातील संधीच्या शोधात असलेले छोटे नेते अजित पवार यांच्याकडे जाण्याचीही शक्यता आहे, शिंदे यांचे सगळेच राजकारण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निमित्ताने पुन्हा एकदा नव्याने बदल करण्याच्या तयारीत आहे. ठाणे ही महानगरपालिका मोठी आहे, तेथे भाजपने युती करायची नाही असे ठरवले, तर शिंदे यांना संपूर्ण ठाण्यात स्वतःची बाजू मांडावी लागेल. तेथील बाजूच्या भागात किंवा नव्याने निर्माण झालेल्या वस्त्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला मानणारा मोठा मतदारवर्ग आहे. यामुळे भाजपही ठाण्यात दमदार प्रदर्शन करू शकेल. नवी मुंबईतील ही गणिते अगदीच वेगळी आहेत, तेथे भाजप हा शिवसेना शिंदे गटाला आव्हान देण्याच्या तयारीत आहे. मुंबई महानगरपालिकेतील सामने थरारक ठरणार असतानाच यामध्ये नवी मुंबईदेखील मागे नाही. हे शहर नव्या आकांक्षांचे शहर आहे, त्यामुळे ती महानगरपालिका ताब्यात राहण्यासाठी रस्सीखेच आहे, महानगरपालिकांच्या निवडणुका गाजतील हे खरे आहे. येत्या आठवड्यात आरक्षण स्पष्ट होईल, प्रारूप रचनाही स्पष्ट झाली आहे, त्यामुळे दिवाळीच्या आधी निवडणुकीचा हंगाम सुरू झालेला आहे. या निवडणुकीत भाजपला क्रमांक एकचा दावा कायम ठेवायचा आहे.

# डॉ बाबासाहेबाच्या धर्मातराकडे पाहण्याचा असाही एक दृष्टीकोन

बौद्ध धर्माच्या इतिहासात आतापर्यंत तीन मोठी परिवर्तने घडून आली आहेत .पहिले परिवर्तन बुद्धाच्या महापरिनिर्वाना नंतर हीनयान पंथाचा झालेला उदय तेव्हा . दुसरे परिवर्तन इ.सनाच्या पहिल्या शतकाच्या आगे मागे महायान पंथाचा झालेला उदय आणि अलिकडेच विसाव्या शतकाच्या मध्य काळात महामनव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धर्माची आधुनिक पायावर केलेली फेर रचना आणि त्यानंतर आपल्या लाखो अनुयांसह बौद्ध धर्माचा केलेला स्विकार. हे तिसरे व गुणात्मकदृष्ट्या बौद्ध धर्मात घडून आलेले सर्वात मोठे क्रांतीकारी परिवर्तन होय. तसे पाहिले तर या व्यतिरिक्तही बौद्ध धर्मात अनेक पंथ व संप्रदाय उदयास आलेले आहेत .या सर्वांचा बुद्धच्या विचारांकडे पाहण्याचे दृष्टीकोन भिन्न भिन्न आहेत.आणि त्याचे बरेवाईट परिणमही बौद्ध धर्मावर आणि सामाजिक जीवनावर झालेले आहेत. या सर्व बौद्ध संप्रदायांवर तत्कालीन ब्राम्हणी धर्माचा फार मोठा प्रभाव होता.आणि आजही आहे. त्या प्रभावाखाली बुद्धाचा मुळ समतावादी सामाजिक विचार दडपला जाऊन त्याचे मोठ्या प्रमाणात विकृतीकरण झालेले आहे.हाच विचार पुढे बुद्ध धर्माचा अविभाज्य भाग बनून बौद्ध धर्म म्हणून समाजात प्रचलित झाला रुजला गेला.हाच धर्म पुढे जगातील अन्य राष्ट्रात पसरून त्याचा जगभर प्रसार झाला. तिथल्या सांस्कृतिक जीवनाचा श्रद्धेचा नि विश्वासाचा एक भाग होऊन बसला. बुद्धाचे झालेले दैवतीकरण.त्याची देव म्हणून बनवली गेलेली प्रतीमा त्यातूनच त्याची पुजा, प्रार्थना, मंत्र, तंत्र, कर्मकांड उपासना इत्यादी भाकडकथा निर्णय झाल्या. या सर्व गोष्टी ब्राम्हणी धर्माच्या संसर्गामुळेच घडून आल्या. त्यामुळे मुळच्या ख–या बौद्ध धम्माचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ही वस्तुस्थिती अनेक इतिहासकार तसेच बौद्ध धर्माच्या अभ्यासक मान्य करतात. याचे ऐतिहासिक संदर्भातही काही प्राचीन गुंफा बुद्ध लेण्या, शिलालेख, चैत्य इत्यादिंमध्ये सापडतात.पुढे याच गोष्टी निरीश्वरवादी बौद्ध धर्माचा एक अंगभूत भाग बनला. आजचा बौद्ध समाज ज्या धार्मिक प्रतिकाची पुजा करतात त्या प्रतिकांना हिंदू पौराणिक कथांचा मोठा आधार आहे.यक्ष, किन्नर, गंधर्व ब्रम्ह आणि इत्तर बौद्ध धर्मात आलेल्या देवी देवता पुनर्जन्माच्या कथा इत्यादी अमानवी शक्तींचे वाढलेला प्रस्थ आणि झालेले उदात्तीकरण या सर्व गोष्टी पौराणिक कथांचा भाग आहेत. पण याचा उगम ब्राम्हणी धर्माच्या दैवी शिकवणूकीत आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. एरवी ईश्वर न माणणा–या आणि विवेक बुद्धीवर विश्वास ठेवून शुद्ध आचरणावर भर देणा–या बौद्ध धर्मात या गोष्टी येतीलच कशा ? आणि याचा या धम्माशी काय संबध ? असा सहाजिकच प्रश्न उपस्थित होतो. आजचा बौद्ध धर्म म्हणजे या सगळ्यांची गोळाबेरीज म्हणता येईल. परंतु या मध्ये बुद्धाचे खरे विचार कोणते आणि खोटे विचार कोणते हे सर्वसामान्यांना समजणे अवघड होते. डॉ बाबासाहेब आबेडकरां सारख्या प्रज्ञावंत महापुरूला या गोष्टींची कल्पना होती.म्हणूनच त्यानी बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वी प्रथम त्याच्या शुध्दीकरणाचा प्रश्न हाती घेतला. बाबासाहेब बुद्धाच्या लोकशाहीवादी सामाजिक विचारांकडे वयाच्या पंधरा सोळा वर्षातच वळले होते. कृष्णाजी केळुसकरांनी लिहिलेले बुद्ध चरित्र वाचून त्यांना नवीन दृष्टी मिळाली. बुद्धाच्या समतावादी विचाराने ते त्यावेळीच प्रभावित झाले होते.पुढे बौद्ध धर्माचा विचार करतांना बुद्धाच्या मुळ विचारांत झालेली भेसळ त्याच्या स्पष्ट लक्षात आली .त्यांनी अथक परिश्रम घेऊन चिकित्सक पध्दतीने बुद्धाचे विचार तर्काच्या कसोटीवर घासून तपासून घेतले आणि नव्या स्वरूपात त्याची सूत्रबद्ध पध्दतीने पुनर्मांडणी केली.यातूनच बुद्धाच्या मुळ मानवतावादी सामाजिक तत्वज्ञानाचा नवा जन्म झाला. यालाच आबेडकर प्रणित नवयान असेही म्हणतात. आधुनिक युगात बौद्ध धर्माची अधिक शास्त्रशुद्ध वैचारिक मांडणी कुणी केली असेल तर ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी होय.बाबासाहेबानी स्वीकारलेला बौद्ध धर्म हा प्राचीन असला तरी तो पारंपारिक मात्र नाही ही गोष्ट आजच्या बौद्धानी नीट समजून घेण्याची आवश्यकता आहे.अन्यथा जुने ते सोने समजून पितळच कवटाळून बसण्याची आणि ख–या सोन्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही.काही प्रमाणात सध्या हेच घडताना दिसते. बौद्ध धर्म म्हणून सध्या ज्याचा आपण विचार करतो तो आबेडकर प्रणित बौद्ध धम्म नसून ते मुळच्या बौद्ध धम्माचे भ्रष्ट रूप आहे.हे नव बौद्धानी लक्षात घेण्याची आवश्यकता आहे.अन्यथा चुकीचा बौद्ध धर्म पुढे नेण्याची आपत्ती ठरू शकते.आणि ही चूक भावी पिढ्यांना महागात पडू शकते. म्हणूनच बाबासाहेबानी स्वतःच्या प्रज्ञेने संशोधित केलेला आणि बुद्धाच्या मुळ शिकवणुकीशी प्रतिशब्द असलेला असा हा मानवतावादी विचार नीट समजून घेण्याची गरज आहे.बाबासाहेबांच्या धर्मातराचे उद्दीष्ट हे केवळ बुद्धाची उपासना किंवा ध्यान धारणा करून व्यक्तीगत मुक्ती साध्य करणे हा नाही, तर समाजाची समतेच्या पायावर पुनर्रचना करणे व माणसाचा सर्वांगिन विकास घडवून आणने हा त्यांच्या धर्मांतराचा मागचा मुळ उद्देश आहे.डॉ बाबासाहेब आबेडकर केवळ बौद्ध धर्माची वैचारिक पुनर्मांडणी करूनच थांबले नाहीत तर समाजाच्या पुनर्रचनेसाठी त्या दिशेने पहिले पाऊल म्हणून आपल्या लाखो अनुयायांसह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी बौद्ध धम्माची दिक्षा घेतली आणि याच दिवशी भारतात नव्या परिवर्तनाच्या युगाचा आरंभ झाला . बाबासाहेबाचे धर्मातर हे औपचारीक किंवा प्रतिकात्मक स्वरूपाचे नव्हते तर समाजात समाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि वेळ पडल्यास राजकीय जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणने हे त्यांच्या धर्मातरा मागचे महान उध्दीष्ट आहे.आबेडकर प्रणित बौद्ध धम्म हा माणसाच्या केवळ आत्मिक सुखाचाच विचार करतो असे नाही, तर तो भौतिक सुखाचाही विचार करतो.यात प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक व राजकीय पिळवणूकीतून निर्मान होणा–या दुखाच्या विनाशाचा विचार आहे. ह्याचे स्पष्ट संकेत त्यांच्या बुद्ध आणि त्याचा धम्म या महान ग्रंथाथच मिळतात. बुद्ध आणि त्याचा धम्म या आपल्या ग्रंथाला लिहिलेल्या परिचय पत्रात ’बुद्धाचे जीवन व शिकवण यांच्या सुलभ आणि स्पष्ट निवेदना बद्दलची आवश्यकता मान्य करून विद्यमान बौद्ध धर्माच्या चार आर्य सत्या बद्दल बाबासाहेबानी काही प्रश्न उसथित करून म्हटले आहे की बुद्धाच्या मुळ शिकवणूकीत त्यांचा अंतर्भाव होतो काय? हे सूत्र बुद्ध धम्माच्या मुळावरच आघात करते.जीवन हे दुःख आहे. मृत्यू हे जर दुःख आहे आणि पुनर्जन्म दुःख आहे तर सर्व काही संपलेच म्हणायचे.ह्या जगात सुखप्राप्तीसाठी धर्म किंवा तत्वज्ञान माणसाला कधीच उपयोगी पडणार नाही.जर दुःखापासून मुक्ती नसेल तर धर्म काय करू शकणार .?’ बुद्धाच्या चार आर्य सत्या बद्दल त्यानी उपस्थित केलेला हा मुलभूत प्रश्न आहे. आणि ही चार आर्यसत्ये मानवी सुखासाठी कुचकामी आहेत असे त्यांना म्हणायचे आहे. यावरून बाबासाहेब माणसाच्या ऐहिक सुखा बद्दल किती गांभिर्याने विचार करतात हे आपल्या लक्षात येते. म्हणून त्यांचा बुद्ध हा मानसाच्या ख–या सुखाचा मार्ग दाखविणारा तत्वज्ञानी बुद्ध आहे.आणि असा बुद्धच त्याना अभिप्रेत होता हे यावरून सिध्द होते.परंतु त्यांच्या अनुयायांचे या गोष्टीकडे अजून तरी जावे तेवढे लक्ष गेलेले दिसत नाहीत.याचे कारण बहुदा त्याच्या जून्या दैववादी धार्मिक सामाजिक मानसिकते असावे. धर्मातरा नंतरही बौद्धाची ही मानसिकता बदललेली नाही. धर्मातराला सत्तर वर्षे झाली तरी त्यांच्या जुन्या पारंपारिक मनोवृत्ती फारसा आजही बदल घडून आलेला नाही. ते आजही बुद्धाकडे मार्गदाता म्हणून न पाहता त्याच्याकडे मुक्तिदाता म्हणूनच पाहतात. त्यामुळेच बुद्धाच्या धार्मिक संघटना कडून आंबेडकर प्रणित बौद्ध धम्मात अवास्तव पुजा प्रार्थनेचे स्तोम माजवले जात आहे.आणि समाजालाही इतर धर्मांप्रमाणे धार्मिक गुंगीत ठेवण्याचे प्रयत्न केले जात आहेत हे बुद्ध आबेडकरांच्या बुद्धीवादी विचारांच्या पूर्णता विरोधी आहे. बाबासाहेबांचा बौद्ध धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा फार व्यापक व वेगळा आहे. त्यांना पारंपारिक धर्म ही संकल्पनाच मान्य नाही. त्यामुळे धर्मांतरासाठी ते कोणत्याही ईश्वरवादी धर्मांच्या फंदात पडले नाहीत.आणि ते अशा चुकीच्या मार्गाने आपल्या समाज बांधवांना नेऊ शकत नाहीत . म्हणून त्यांनी बुद्धीप्रामाण्यवादी अशा बौद्ध धम्माचा स्विकार केला.आणि या मार्गाने जाण्यातच समाजाचे आणि व्यक्तिचेही हित आहे असे सांगितलेले. माझा समाज पुन्हा अंधश्रद्धेला बळी पडून आपले मानसिक, बौध्दिक; सामाजिक व राजकीय स्वतंत्र्य गमावणार नाही याची दक्षता घेऊनच त्यानी बौद्ध धम्माचा स्विकार केला.आता बौद्ध समाजापुढे दोनच पर्याय आहेत. ते म्हणजे बाबासाहेब आंबेडकरानी दाखवलेल्या बुद्धाच्या डोळस मार्गाने जयाचे की ब्राम्हणी धर्माने प्रदुषित झालेला नि अंधश्रद्धेवर आधारलेल्या पारंपरिक बौद्ध धर्माच्या मार्गाने,? .ज्यांची विवेक बुद्धी जागृत आहे आणि सामाजिक वास्तवाचे पुर्ण भान आहे तेच लोक बाबासाहेबानी दाखवून दिलेल्या मार्गाने पुढे जातील अशी मला आशा आहे.

**********

बी. एस. जाधव (कोकिसरे)
मो.नं. ९७७३४५०९४६

# देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध – प्रवीण बागडे



देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. बी. आर. गवई यांच्यावर मनुवादी विचारांचा वकील राकेश किशोर याने बुट भिरकावल्याचा अत्यंत नीच प्रकार केला आहे. आज सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात ‘सनातन का अपमान नही सहेंगे’ म्हणत हल्ल्याचा प्रयत्न करण्याची घटना अत्यंत संतापजनक आहे. राकेश किशोर याने केलेला हा प्रकार थेट भारताच्या न्यायव्यवस्थेवर हल्ला आहे. या घृणास्पद कृत्याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो! देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा हल्ला नसून, भारतीय न्यायव्यवस्था, संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवर झालेला गंभीर प्रहार आहे. या भ्याड कृत्याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. न्यायव्यवस्था हीच लोकशाहीची खरी हमी आहे आणि त्या व्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीवरच जर अशा प्रकारचा हल्ला झाला, तर तो संपूर्ण राष्ट्रासाठी चिंताजनक आहे.

पाच हजार वर्षांपासून देशाला गुलाम केलेल्या या मनुवादी, वर्णवर्चस्ववादी व्यवस्थेला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून मुक्त केले. पण विषमतावादी, मनुवादी विचारांनी ग्रासलेल्या प्रवृत्ती अजूनही भारतात आहेत आणि आज त्याच प्रवृत्तीने थेट देशाच्या न्यायव्यवस्थेवर हल्ला केला आहे. त्यामुळेच आज एक दलित सरन्यायाधीश न्याय व्यवस्थेच्या सर्वोच्च पदावर विराजमान झालेले या मनुवाद्यांना सहन होत नाही, कारण त्यांना न्यायव्यवस्थेत, प्रशासनात, किंवा सत्ताकेंद्रात दलितांचे अस्तित्व सहन होत नाही. या संतापाच्या मुळाशी द्वेष नाही, तर दलितांच्या प्रगतीबद्दल असलेली असहिष्णुता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या व्यक्तीविरुद्ध अशा प्रकारची घटना झाल्यामुळे न्यायपालिकांच्या सुरक्षिततेवर देखील मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सरन्यायाधीश यांच्या मातोश्रींनी दोनच दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यास नकार दिला होता.

लोकशाहीच्या पाया रचणाऱ्या प्रमुख खांबांमध्ये न्यायव्यवस्था ही सर्वात महत्त्वाची आहे. या न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या सरन्यायाधीशांवरच जर हल्ला घडला, तर तो केवळ एखाद्या व्यक्तीवर झालेला आघात नसून, भारतीय संविधान, कायदा आणि लोकशाही व्यवस्थेवरच झालेला थेट प्रहार आहे. असा हल्ला हा न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा डागाळण्याचा, समाजात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्याचा, तसेच न्यायावरचा विश्वास डळमळीत करण्याचा कपटी प्रयत्न आहे. सर्वोच्च न्यायालयाचा परिसर जो देशातील न्यायमंदिर मानला जातो तिथेच अशा प्रकारची घटना घडणे हे अतिशय चिंताजनक आहे. हा देश संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधूतेच्या मुल्यांवर उभा आहे. संविधानाने दिलेल्या सामाजिक न्याय आणि समान संधीच्या तत्वामुळे मनुवाद्यांच्या पोटात मळमळ होत आहे. आज देशात उजव्या विचारांची सत्ता आहे, विषमतावादी आरएसएस ने शतकपूर्ती केलेली आहे, अशा काळात एक दलित व्यक्ती न्यायपीठाच्या सर्वोच्च पदावर बसलेला या मनुवाद्यांच्या डोळ्यात खुपत आहे.

लोकशाही शासनपद्धती आणि कायद्याचे राज्य या मनुवाद्यांना उलथवून टाकून मनुवादी व्यवस्था पुनर्स्थापित करायची आहे. हेच त्यांच्या अखंड भारताचे स्वप्न आहे. भ्याडपणे हल्ला करणाऱ्यांचा निषेध करणे पुरेसे नाही, तर अशा प्रवृत्तींचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणे गरजेचे आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा देणे हे न्यायव्यवस्थेप्रती खरी बांधिलकी ठरेल. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप आहे आणि हा संताप स्वाभाविकही आहे. कारण सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे देशातील सामान्य माणसाच्या हक्कांवर आणि सुरक्षिततेवर हल्ला होय. समाजाने, माध्यमांनी आणि सत्ताधाऱ्यांनी मिळून या प्रकरणात स्पष्ट व ठाम भूमिका घेतली पाहिजे. न्यायालयाची प्रतिष्ठा, संविधानावरील विश्वास आणि लोकशाहीचे रक्षण ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. लोकशाही विरोधी, जातीयवादी राकेश किशोर वर सरकारने तत्काळ कठोर कार्यवाही करावी. तसेच, या घटनेत सामील आरोपींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा दिली जावी, अशी आमची ठाम मागणी आहे. न्यायालयाचे गौरव, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता यांचे रक्षण करणे हे सर्वसामान्य जनतेचे, माध्यमांचे तसेच शासनाचे सामूहिक कर्तव्य आहे. सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे न्यायाच्या मंदिरातील शुद्धतेवर आघात! लोकशाहीत हा अपराध कधीच सहन केला जाणार नाही.

*********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# सरन्यायाधीश बी आर गवई यांच्यावर बूट भिरकवणे हा देशातील जातीयवादी विखारी मानसिकतेचा देशाच्या सर्वोच्च न्याय व्यवस्थेवरील हल्ला आहे

आपला देश स्वतंत्र होऊन आठ दशके होत आली आहेत तरी सुद्धा आपल्या मधील हजारो वर्षे जुने रीतीरिवाज, स्पृश्य अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, वर्ण वर्चस्ववाद , जातीयता, उच्चनीचता, जातीयवादी विखारी मानसिकता आणि अमानवीय प्रवृत्ती जाता जात नाही. याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे काल आपल्या सर्वोच्च न्यायालयात घडलेली अत्यंत घृणास्पद आणि आपल्या लोकशाही शासन व्यवस्थेला काळीमा फासणारी असंवैधानिक घटना ती म्हणजे देशाच्या सर्वोच्च न्यायालयात वकीली ( पेहयावाच्या ) काळ्या कोटाच्या आड दडलेल्या एका राकेश ’की’ शोर नावाच्या विकृत जातीयवादी विखारी मानसिकतेच्या उन्मत्त वकीलाने कायद्याची भीडभाड न बाळगता चक्क सुप्रीम कोर्टात ( कोर्टरुम मध्ये ) अर्थात सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय मंदिरातच देशाचे सी. जे. आय. अर्थात चीफ जस्टिस ऑफ इंडिया तथा सरन्यायाधीश बी आर गवई यांच्यावर बूट भिरकावून मारला, हा केवळ धर्माने बौद्ध असलेल्या सरन्यायाधीश माननीय भूषण गवई साहेब यांच्यावरील हल्ला नाही तर हा एका विकृत जातीयवादी मानसिकतेचा पुरस्कार करणाऱ्या मनुवादी विचाराने ग्रासलेल्या विघ्नसंतोषी कुत्सित विचारांच्या धर्ममार्तंडांनी देशाच्या सर्वोच्च न्याय व्यवस्थेवर केलेला अक्षम्य असा पूर्वनियोजित कट सदृश निंदनीय हल्ला आहे. हा राष्ट्रीय एकात्मतेवरील हल्ला आहे, हा देशाच्या अखंडतेवरील हल्ला आहे, हा देशाच्या सार्वभौमत्वावरील हल्ला आहे, हा संविधानिक सर्वोच्च संस्थेवरील हल्ला आहे. हा देशाला न्याय ,समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व प्रदान करणाऱ्या विश्वरत्न, महामानव, प्रकांड पंडित जागतिक दर्जाचे घटनातज्ञ यांनी देशाला दिलेल्या जगातील सर्वोत्तम राष्ट्रघटनेवरील तथा संविधानावरील भ्याड आणि अत्यंत घृणास्पद हल्ला आहे. या हल्ल्याचा संपूर्ण देशातून आणि तमाम संविधान प्रेमी जनतेतून तीव्र निषेध करण्यात येत आहे. सदर हल्ल्याची घटना सर्वोच्च न्यायालयाच्या आजवरच्या इतिहासातील ही एकमेव घृणास्पद आणि तिरस्करणीय राष्ट्रद्रोही घटना आहे.

या निंदनीय घटनेमुळे देशातील तमाम संविधान प्रेमी जनतेच्या मनात अनेक शंका आणि प्रश्न निर्माण होतात ते म्हणजे देशाच्या सार्वभौम सर्वोच्च न्याय व्यवस्थेच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीवर तथा सर न्यायाधीशांवर अशा प्रकारे भ्याड हल्ला करण्याची कोणीही व्यक्ती हिंमतच कशी करु शकते ? हा पहिला प्रश्न, दुसरा प्रश्न देशाच्या सर न्यायाधीशांना असलेली झेड दर्जाची सुरक्षा यंत्रणा त्या वेळी काय करत होती ? प्रश्न तिसरा हल्लेखोर व्यक्ती ही पेशाने वकील आहे. पेशाने वकील असलेल्या त्या जातीयवादी विखारी विचार सरणीच्या उन्मत्त वकीलाचा देशाच्या न्याय व्यवस्थेवर विश्वास नाही का ? न्याय व्यवस्थेवर विश्वास असलेली न्याय व्यवस्थेत कार्यरत असलेली कोणतीही व्यक्ती असे असंविधानिक कृत्य कदापि करणार नाही. मग त्याने असे कृत्य का केले ? सरन्यायाधीश बी आर गवई हे बौद्ध धर्मिय आहेत म्हणून की ते मागास जातीचे आहेत म्हणून ? हल्लेखोराला नेमकं काय हजम झालं नाही मग असे असंविधानिक कृत्य त्यांनी स्वतः केले की त्याला करण्यास कोणी प्रवृत्त केले. या मागचे खरे सुत्रधार कोण ? नेमकं कोणाच्या वरदहस्तामुळे त्याने एवढं मोठं धाडस केले हा सर्व संशोधनाचा आणि चिंतनाचा विषय आहे.

देशाच्या घटनात्मक सर्वोच्च न्याय संस्थेच्या सर्वोच्च सरन्यायाधीश पदावर विराजमान असलेल्या कोणत्याही जाती धर्माच्या, पंथाच्या, संप्रदायाच्या व्यक्तीला त्या पदावर विराजमान झाल्यानंतर कोणताही न्याय देताना नैसर्गिक न्यायाच्या घटनात्मक चौकटीत राहून संविधानिक मुल्यांची जराही पायमल्ली न करता धर्मनिरपेक्ष राहून निस्वार्थ वृत्तीने न्यायदान करावे लागते. त्यानुसार सरन्यायाधीश भूषण गवई आपली न्यायिक जबाबदारी निःपक्षपाती पणे बजावत आहेत. असे असताना ते केवळ एका विशिष्ट जातीचे असल्याने त्यांना जातीयवादी विखारी मानसिकतेने टार्गेट करणे हे अशोभनीय वर्तन आहे, अशी जातीयवादी विखारी विकृत मानसिकता आणि त्या मधून घडलेले सदर दुष्कृत्य देश विघातक कृत्य आहे, अशी मानसिकता देशाच्या संविधानिक लोकशाहीला, सार्वभौमत्वाला, अखंडतेला आणि एकात्मतेला घातक आहे. अशा जातीयवादी विखारी प्रवृत्तीला तात्काळ कायदेशीर ठेचून काढले पाहिजे. संबंधित जातीयवादी विखारी विकृत मानसिकतेच्या वकीलाची सनद कायम स्वरुपी बाद करून त्यांच्यावर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यावर कठोरात कठोर कारवाई करुन अशा जातीयवादी विखारी प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन केले पाहिजे अन्यथा अराजकता डोकं वर काढायला वेळ लागणार नाही. अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे. आणि अशाज्ञ प्रकारची घृणास्पद निंदनीय जातीयवादी मानसिकता या पुढे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. सदर निंदनीय घटनेचा जाहीर निषेध. विश्वास गायकवाड, बोरघर /माणगाव

# भारतीय संविधानाची उद्देशिका

आपल्या भारत देशाचे संविधान प्रत्येक भारतीयांनी वाचण्याची नितांत गरज आहे. तसेच आपल्या केंद्र आणि राज्य सरकार यांनी आपल्या शाळांमधून संविधानाचे पाठ मुलांच्या अभ्यासासाठी ठेवण्याची गरज आहे. भारतीय संविधान हा राष्ट्रीय ग्रंथ आहे. तो ग्रंथ आपल्या सर्व भारतीय नागरिकाला समजणे गरजेचे. आता प्रत्येक शाळा मधून रोज संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले जात असते. ती उद्देशिका काही मुलांची तोंडपाठ सुद्धा झालेली असणार आहे. उद्देशिकेतील प्रत्येक शब्दांचा अर्थ सर्व मुलांना समजणे गरजेचे आहे. त्यासाठी माझ्या वाचनात आलेले शब्दांचे अर्थ आपण माहिती करून घेतले पाहिजेत.

भारतीय संविधानाची उद्देशिका.

प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून घेऊया आणि अगदी एका एका वाक्यात भारतीय संविधानाची उद्देशिका.

✻ आम्ही :– स्वातंत्र्यापूर्वी आपण एकत्र नव्हतो ,विखुरलेले होतो, संविधानाने ' मी ' ला 'आम्ही ' केले .

✻ भारताचे लोक : – विविध वतने ,राजांची स्वतंत्र राज्य ,वेगवेगळे व आपापले भूभागाचे लोक एकमेकांना एकाच देशाची समजत नसत ,यांना संविधानाने एका देशाचे /भारताचे नागरिक /लोक म्हटले.

✻ सार्वभौम :– आपण आपल्या देशात आपल्याला योग्य वाटतील असे निर्णय घेण्यास स्वतंत्र आहोत.

✻ समाजवादी :– आमच्या देशात गरीब आणि श्रीमंत यांच्यात मोठी दरी असणार नाही, देशाच्या संपत्तीवर सर्वांचा हक्क असेल ,संपत्तीचे काही मोजक्या लोकांच्या हाती केंद्रीकरण होणार नाही, याची काळजी घेतली जाईल.

✻ धर्मनिरपेक्ष :– विविध धर्माचे लोक असणारा देश चालवताना मात्र शासनातील व्यक्तींना काम करताना कोणताही धर्म असता कामा नये, कोणत्याही एकाच धर्माला राज्याचा धर्म मानला जाणार नाही, धर्म हा व्यक्ती पुरता असावा तो रस्त्यावर आणू नये.

✻ लोकशाही गणराज्य :– लोकांकडून मतदानाद्वारे निवडलेला प्रतिनिधी या राष्ट्राचे काम पाहिल, लोकांच्या मतालाच प्रचंड किंमत असेल, लोक ठरवतील त्याचीच टीम लोकांचे भले करणारी काम करण्यासाठी निवडली जाईल.

✻ घडवण्याचा :– वरील प्रमाणे असणारा असा देश निर्माण करण्याचा.

✻ सामाजिक न्याय :– व्यक्तीमध्ये जात, धर्म व भाषा प्रदेश जन्मस्थान किंवा लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव केला जाणार नाही, माणूस म्हणून सर्वांचा दर्जा सारखाच असेल. अस्पृश्यते सारखी बहिष्कृत करण्यासारखी परिस्थिती निर्माण न होऊ देणारा.

✻ आर्थिक न्याय :– कोणत्याही एकाच प्रकारच्या कामासाठी समान वेतन मूल्य दिले जाईल ,देशातील प्रत्येकाला कोणत्याही भेदभावाशिवाय आपल्या आवडीप्रमाणे उपजीविकेचे साधन मिळविण्याचा हक्क असेल.

✻ राजनैतिक न्याय :– लोकशाही प्रक्रियेत महिला पुरुष व अन्य लिंगीय व्यक्तींना व प्रत्येक घटकास निवडणूक प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवता येईल व त्याला त्याचे मत देण्याचा व निवडणूक लढविण्याचा अधिकार असणारा.

✻ विचार स्वातंत्र्य :– देशाच्या नागरिकास स्वतंत्रपणे विचार करण्याचे स्वातंत्र्य असेल ,त्यावर कोणाचाही अंकुश असणार नाही.

✻ अभिव्यक्ती स्वातंत्र्य :– प्रत्येकास आपला विचार मांडण्याची मुभा असेल ,विचार मांडताना व्यक्तीद्वेषी विचार नसतील ,तर त्यावर कोणाचेही बंधन नसेल ,लिहिणे, बोलणे ,सादर करणे याचे स्वातंत्र्य असेल.

✻ विश्वास स्वातंत्र्य :– प्रत्येकास आपण मानत असलेल्या मूल्यानुसार विश्वास ठेवण्याचे स्वातंत्र्य असेल त्यावर कोणाचे बंधन नसेल.

✻ श्रद्धा व उपासना स्वातंत्र्य :– प्रत्येक व्यक्ती कोणत्याही धर्मावर श्रद्धा ठेवू शकतो व त्यानुसार उपासना करू शकते , धर्मांतर करणे ,धर्म स्वीकारणे वा नाकारण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीस असणार आहे.

✻ दर्जाची समानता :– प्रत्येकास समान वागणूक दिली जाईल याची खात्री ,त्याचा अपमान होणार नाही अशी व्यवस्था, कोणासही आपला दर्जा उंचावण्याचा अधिकार असेल, आर्थिक सामाजिक व इतर प्रकारचा दर्जा उंचावताना त्या व्यक्तीस कोणीही आडकाठी करणार नाही.

संधीची समानता :– प्रत्येक नागरिकास समान संधी व समान काम मिळेल याचे नियोजन असेल कोणत्याही कारणाने कोणास संधीच उपलब्ध होणार नाही अशी स्थिती राहणार नाही, लोकांना आपली प्रगती साधता येईल.

✻ व्यक्तीची प्रतिष्ठा :– नागरिकांना आपली प्रतिष्ठा अबाधित ठेवता येईल असे वातावरण निर्माण केले जाईल ,कोणाच्याही प्रतिष्ठेस ठेच लागणार नाही याची आपण काळजी घेऊ.

✻ राष्ट्राची एकता :– विविधतेने नटलेले राष्ट्र एकात्म राहिला हवे, आम्ही एकमेकांमध्ये इतकी मिसळून जावे की एकापेक्षा दुसरा वेगळा आहे असे चित्रही न दिसावे असे आश्वासन मिळावे.

✻ बंधुता :– देशातील नागरिकांनी एकमेकांशी वागताना बंधुत्व भावनेने वागावे प्रत्येक व्यक्ती आपलाच आहे ही भावना निर्माण व्हावी.

✻ प्रवर्धित करण्याचा :– वरील सारे भारतात निर्माण करण्याचा...

✻ संकल्प पूर्वक निर्धार :– मनामध्ये पक्का विचार करून ठेवून, मनात नक्की करून ,आमच्या संविधान सभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान...

✻ अंगीकृत :– भारतीय संविधान स्वीकारून.

✻ अधिनियमित :– याबाबतचा नियम कायदा बनवून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत.

वरील प्रमाणे आपल्या संविधानाची उद्देशिका प्रत्येक शब्दाच्या अर्थासह प्रत्येकाला माहिती असणे गरजेचे आहे.

✻✻✻✻✻✻✻

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६९७६१

## राजर्षी शाहू शाळेचा पालक मेळावा संपन्न..




केज/प्रतिनिधी शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत दरवर्षीप्रमाणे पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ड. राजेसाहेब देशमुख उर्फ पापा यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून केजमधील ज्येष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त शिक्षक श्री.हनुमंत घाडगे यांची उपस्थिती होती. मंचावर संस्थेचे सचिव श्री.जी.बी. गदळे, सामाजिक कार्यकर्ते प्रा.हनुमंत भोसले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बी.बी.चाटे यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगती बाबत सूचना व्यक्त केल्या यामध्ये बहुतांश पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.पालकांमधून दिलीप बनसोडे यांनी प्राथमिक स्वरूपात आपले मत मांडले.पालकांच्या सूचना बाबत संस्थेचे सचिव श्री. जी. बी.गदळे यांनी संस्थेच्या वतीने उत्तर दिले.उपस्थित हनुमंत घाडगे सर यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत, अभ्यासाबाबत महत्त्वाच्या सूचना केल्या. महापुरुषांचे चरित्र वाचून आदर्श घ्या असे आवाहन त्यांनी यावेळी केले. श्री. भोसले सर यांनीही उपस्थित पालकांना शाळेतील अभ्यास वेळेवर करणे याबाबतीत सूचना केल्या.अध्यक्षीय भाषणात ड.राजेसाहेब देशमुख यांनी शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कायमच आग्रही असते,सर्व तळागाळातील मुलांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी आपण कार्यरत आहोत असे मत मांडले.एकंदरीत शाळेच्या प्रगती बाबत सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचलन शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. व्ही.बी.यादव, प्रास्ताविक श्री.जी.बी. डीरंगे तर आभार श्री.जे.आर.मस्के यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री.ए.डी.देशमुख,श्री. आर.एस. क्षीरसागर, श्रीमती अनिता जाधव यांनी सहकार्य केले.पालक मेळाव्यास सर्व शिक्षक व पालक उपस्थित होते.

## नारायणदादांमुळे सर्वसामान्य कुटुंबातील मुले मोठ्या पदावर –मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांचे गौरवोद्गार

### कृतज्ञता सोहळयात प्राचार्य मधुकर गायकवाड यांचा गौरव

केज/प्रतिनिधी :– महाराष्ट्राच्या निर्मितीसोबतच स्थापन झालेल्या खेड्यातील शाळांनी ग्रामविकासात मोठे योगदान दिले. स्व नारायणदादा काळदाते यांच्या मुळेच ग्रामीण भागातील कष्टकरी , बहुजन समाजातील मुले मोठ्या पदावर पोहोचू शकली, असे गौरवोद्गार मा. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी काढले.

माजी कुलगुरु, प्राचार्य मधुकरराव गायकवाड यांच्यावतीने रविवारी (दि.पाच ) बनसारोळा येथील महाराष्ट्र विद्यालयाच्या प्रांगणात कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमास पदवीधर आमदार मा.सतीश चव्हाण, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी आ.वैजनाथ शिंदे, यांच्यासह माजी कुलगुरु डॉ.एन.व्ही.कल्याणकर (गडचिरोली), डॉ. देवानंद शिंदे (कोल्हापूर), माजी बिसीयुडी संचालक डॉ. भागवतराव कटारे, प्रकूलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे, संचालक ज्ञानेश्वर काळदाते, बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे, अध्यक्ष भागवतराव गोरे, प्राचार्य डॉ .बाबासाहेब गोरे, अनिलपंत कुलकर्णी यांची मंचावर उपस्थिती होती . प्रारंभी संस्थेच्या वतीने मंगलाताई व प्राचार्य मधुकर गायकवाड यांचा पाहुण्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ.विजय फुलारी म्हणाले, कोणत्याही क्षेत्रात नावलौकिक मिळवायचा असेल तर पारंपरिक शिक्षणासोबतच व्यावहारिकता, शहाणपणाची जोड असायला हवी. प्राचार्य मधुकर गायकवाड यांनी नारायण दादांचा समाजसेवेचे काम पुढे नेले. स्व. वसंतराव काळे यांची मोठे योगदान त्यांच्या जडणघडणीत आहे. गायकवाड सरांसारखाच सर्वांना सोबत घेऊन पुढे गेले पाहिजे, असेही कुलगुरू डॉ . विजय फुलारी म्हणाले. अन्न, वस्त्र, निवारा अन् शिक्षण या चारही गोष्टी देणाऱ्यांबद्दल कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, असे प्राचार्य मधुकरराव गायकवाड म्हणाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी कार्यकारिणी सदस्य तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु म्हणूनही प्राचार्य गायकवाड यांनी काम उत्तम काम केले, असे आ. सतीश चव्हाण म्हणाले. माती आणि माता यांचे ऋण फेडण्याचा उपक्रम म्हणजे हा कार्यक्रम आहे, असे आ. विक्रम काळे म्हणाले. कार्यक्रमाच्या आयोजनामागची भूमिका डॉ.नरेंद्र काळे यांनी मांडली. ग्रामीण भागातील शाळा वाचवण्याची गरज आज निर्माण झाली आहे, असे ते म्हणाले. नारायणदादा काळदाते आणि वसंतराव काळे यांच्यामुळे गायकवाड सरांसह मान्यवरांची जडणघडण झाल्याचा गौरवही डॉ. काळे यांनी केला. यावेळी डॉ.नयना गायकवाड, डॉ. वाल्मिक सरवदे, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. एन व्ही कल्याणकर, वैजनाथ शिंदे, ज्ञानेश्वर काळदाते यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.संजय शिंदे यांनी सन्मान पत्राचे वाचन केले.डॉ. अनुजा जाधव, प्रा. दादासाहेब लोंढे यांनी सूत्रसंचालन तर डॉ. सुषमा जाधव यांनी आभार मानले. प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत प्रा .निळकंठ, बाळासाहेब, विजय, उदय, अमोल , सुध्दा व भगवान गायकवाड यांनी केले.



सोबत फोटो कॅप्शन: बनेश्वर शिक्षण संस्थेच्या वतीने मा.कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते मंगलाताई व प्राचार्य मधुकर गायकवाड यांचा गौरव करण्यात आला. यांनी आ.सतीश चव्हाण, आ.विक्रम काळे यांच्यासह मान्यवर.

## संविधानाच्या प्रकाशात मनुवाद अंधार शोधतोय...!



आज सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. बी.आर. गवई यांच्या विरोधात मनुवादी विचारसरणीचा मुखवटा घालून बसलेल्या वकील राकेश किशोर या व्यक्तीने केलेला बूट हल्ला हा फक्त एक व्यक्तीवरील नव्हे तर संपूर्ण भारतीय संविधानावर केलेला हल्ला आहे. हा प्रकार केवळ नीच नाही, तर आपल्या लोकशाहीच्या मुळावर प्रहार करणारा आहे. ज्यावेळी न्यायासनावर बसलेला एक दलित न्यायाधीश, आपल्या परिश्रम, बुद्धिमत्ता आणि प्रामाणिकतेच्या बळावर सर्वोच्च पदावर पोहोचतो, तेव्हा हजारो वर्षांच्या वर्णवर्चस्ववादी मनोवृत्तींना जाळ लागतो. कारण त्या व्यवस्थेला हे सत्य अजूनही पचलेले नाही की दलित माणूसही निर्णय देऊ शकतो, तोही देश चालवू शकतो! डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून या देशाला मनुवादी गुलामीतून मुक्त केले, आणि म्हणूनच आज बी.आर. गवई सारखे न्यायाधीश न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च पदावर पोहोचले. पण ज्यांना समता हा शब्द शाप वाटतो, ते अजूनही त्या जुन्याच वर्णव्यवस्थेचे स्वप्न बघतात जिथे न्याय त्यांच्या जातीच्या चपलांखाली असतो. मनुवाद्यांना आज पोटात दुखतंय कारण शूद्र म्हणवलेला आज सर्वोच्च न्यायासनावर बसलेला आहे. मनुवाद्यांना आज जळतंय कारण संविधान त्यांच्या जातीच्या हुकुमशाहीला प्रश्न विचारतंय. मनुवाद्यांना आज राग येतोय कारण या देशात आता जय भीम ही घोषणा न्यायालयातही ऐकू येते! आणि या सर्वाचा शिखरबिंदू म्हणजे न्यायमूर्ती बी.आर. गवई यांच्या मातोश्रींनी ठ्ठ्ड च्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यास नकार देऊन एक मौन संदेश दिला आम्ही झुकणार नाही! हीच ती विचारक्रांती आहे जी डॉ. बाबासाहेबांनी सुरू केली होती आणि जी आजही या देशातील प्रत्येक अन्यायग्रस्त, प्रत्येक दलित, प्रत्येक प्रामाणिक नागरिकाच्या रक्तात वाहते आहे. आज देशात विषमता पुन्हा उभी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. अखंड भारतच्या नावाखाली पुन्हा मनुवादाचं राज चालवायचं स्वप्न पाहणाऱ्यांना लक्षात ठेवावं लागेल हा देश आता संविधानाचा आहे, मनुस्मृतीचा नाही! संविधानाने दिलेली स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही काही कोणाच्याही दयेवर नाहीत ती आपल्या हक्काची आहेत. आणि जर पुन्हा कुणी त्या हक्कांवर बूट उगारले, तर त्या प्रत्येक बूटाच्या आवाजाला लोकशाहीच्या न्यायप्रिय माणसांनी जय भीम!च्या घोषणांनी उत्तर दिलं पाहिजे.

✻✻✻✻✻✻✻✻✻✻

लेखक – कुणाल राजेश्री धोंडीराम कांबळे

## न्यायव्यवस्थेचा अपमान की असहिष्णुतेचा उद्रेक?

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर सुनावणीदरम्यान बूट फेकण्याचा प्रकार घडला, ही घटना भारतीय लोकशाही आणि न्यायसंस्थेच्या सन्मानावर घाव घालणारी आहे. न्यायालय हे देशाच्या लोकशाही रचनेचे एक मूलभूत स्तंभ आहे. न्यायमूर्तींवर, विशेषतः सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशावर, अशा प्रकारे आक्रमण करणे केवळ वैयक्तिक अपमान नाही तर संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेचा अवमान आहे. असहमती व्यक्त करणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. परंतु असहमती व्यक्त करण्याचे साधन हिंसक किंवा अवमानकारक असू नये. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि असहिष्णुता यांच्या सीमेची ओळ आपण विसरू नये. न्यायालयाच्या निर्णयांबाबत टीका करणे योग्य आहे, पण न्यायासनावर बसलेल्या व्यक्तीवर आक्रमण करणे लोकशाहीच्या संस्कृतीला शोभणारे नाही. ही घटना केवळ एका व्यक्तीच्या संतापाचा परिणाम म्हणून न पाहता, ती समाजातील वाढत्या असहिष्णुतेचे प्रतीक म्हणून पाहण्याची गरज आहे. आज समाजात मतभेदांवर संवादाऐवजी आक्रमणाची प्रवृत्ती वाढताना दिसते. ही प्रवृत्ती लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. न्यायालयाने आणि शासनाने अशा घटनांकडे केवळ सुरक्षा त्रुटी म्हणून न पाहता, नागरिक शिक्षण आणि सामाजिक संवाद वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच न्यायव्यवस्थेवरील विश्वास अबाधित ठेवण्यासाठी सर्व स्तरांवर संयम, आदर आणि विवेक यांचे पालन होणे गरजेचे आहे. निष्कर्षतः, सरन्यायाधीश गवई यांच्यावर झालेला बूटफेक प्रकरण हा केवळ एक प्रसंग नाही; तो समाजातील तणाव, असहिष्णुता आणि असंतोषाचा प्रतिबिंब आहे. न्यायव्यवस्थेचा सन्मान राखणे हे केवळ न्यायालयाचे नव्हे तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. असहमती व्यक्त करा, पण आदराची सीमा ओलांडू नका – हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

## ओला दुष्काळ जाहीर करा या सह विविध प्रश्नावर युसुफवडगाव येथे शेकापचा एक तास रस्ता रोको आंदोलन

### उद्योगपतीचे कर्जमाफ शेतकऱ्यांचे का नाही ! सरकार शेतकऱ्यांना उध्वस्त करून भांडवलादारीची दलाली करत आहे-भाई मोहन गुंड

केज/प्रतिनिधी :– केज तालुक्यातील युसुफवडगाव येथे दिनांक ६ ऑक्टोंबर२०२५ रोजी १०–०० वाजता शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शिवाजी महाराज चौक येथे एक तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी सरकारच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला या वेळी बोलताना शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनी शासनाच्या नाकर्ते पणाचा पाडाच वाचला. लाडक्या बहिणी सारख्या अनेक योजना कोणी ही मागणी केली नसताना अशा योजना बळजबरीने का?सरकार लोकांनवर लादत आहे. एकीकडे सरकारच्या तिजोरीत पैसे नाहीत. राज्यकर्ते बोंबबलतात आणि दुसरीकडे नको असलेला शक्तिपीठ बळजबरीने करण्याचा घाट सरकार घालत आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची १५ रुपये कापात न करता शक्तीपीठ महामार्ग रद्द करून त्याची रक्कम पूरग्रस्त शेतकऱ्यांना द्या. पिक विम्याचे तिन्ही ड्रेगर लागु करा. मागील वर्षी एक रुपयात पिक विमा कोणी ही मागितला नसताना तो ही आमच्या माती मारला. कोटी रुपयाचा घोटाळा सरकार मध्ये पुढारी, विमा कंपनीने मिळुन केला. अशा अनेक प्रश्नाला हात घालत भाई मोहन गुंड यांनी शासनावर सडकुन टिका केली आणि आम्हाला उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्याची वेळ येऊ देऊ नका असा इशारा दिला. यावेळी निवेदनात :– ओला दुष्काळ जाहीर करून, पन्नास हजार रुपये हेक्टरी मदत करा,पशुधन मयत झालेल्या शेतकऱ्यांना विषेश भरपाई देऊन पशुधन खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून द्या, अतिवृष्टीत मयत झालेल्या कुटुंबांना प्रत्येकी २० लाखाची मदत करा, कर्ज माफी करा, पिक विमा कंपनीने रद्द केलेला ट्रेगर पुन्हा लागु करा, तालुक्यातील मागील वर्षीचा विमा वाटप करा,खरीप २०२५ पिक विमा भरला त्या शेतकऱ्यांना १०० टक्के नुकसान गृहीत पिक विमा लागु करा,ऊस उत्पादक शेतकऱ्याचे १५ रुपये प्रतिटन प्रमाणे सरकारने वसूल न करता, शक्तीपीठ महामार्ग रद्द करून पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी. या मागणीचे निवेदन महसुल अधिकारी यांना देण्यात आले यावेळी भाई रामलिंग पाटील,भाई मंगेश देशमुख, भाई महेश गायकवाड, उमाकांत आप्पा भुसारी, रुपेश बोरगावकर, भाई मंगेश देशमुख, भाई महेश गायकवाड, जयराज निशिगंध, सचिन उजगरे, प्रभुलिंग निगडीकर ओमकार लामतुरे, राहुल इंगळे गणेश खानवरे, मयूर सुरवसे दीपक नांदे, दादा निकम, उत्तरेश्वर खरबड जयराज मुकदम विकास जाधव, विजय शिंदे. यासह शेतकरी उपस्थित होते व पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.




## जनसुविधा योजनेअंतर्गत लातूर ग्रामीणमधील २७ गावात विविध कामासाठी दोन कोटी मंजूर

लातूर :– जिल्हा वार्षिक योजनेतून ग्रामपंचायतीला जन सुविधेसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील २७ गावातील विविध विकास कामासाठी २ कोटी ३ लक्ष रुपयाचा निधी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मंजूर झाले आहेत. सदरील निधी मंजूर केल्याबद्दल त्या त्या गावातील भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावात जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायतीला जनसुविधेसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत निधी मिळावा यासाठी भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी प्रयत्न केले. केलेल्या प्रयत्नामुळे लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात लातूर तालुक्यातील ११ गावात रेणापूर तालुक्यातील १० आणि भादा सर्कल मधील ६ गावात आशा एकुण २७ गावातील विविध कामासाठी २ कोटी ३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

ग्रामपंचायतीला जनसुविधेसाठी विशेष अनुदान योजनेतून रेणापूर तालुक्यातील कामखेडा ५ लक्ष, दवणगाव ७ लक्ष, माकेगाव २५ लक्ष, यशवंतवाडी ७ लक्ष, रामवाडी ख. ७ लक्ष, लहानेवाडी ७ लक्ष, धवेली ७ लक्ष, सिधंगाव १० लक्ष, दिवेगाव ७ लक्ष, लातूर तालुक्यात कानडीबोरगाव ६ लक्ष, पिंपळगाव आंबा ६ लक्ष, करकट्टा ७ लक्ष, निवळी १० लक्ष, सावरगाव ७ लक्ष, चिंचोलीराव ७ लक्ष, सामनगाव ७ लक्ष, खुलगापूर ७ लक्ष, रुई ७ लक्ष, ढाकणी ७ लक्ष, भोईसमुद्रा ७ लक्ष, आणि औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील येल्लोरी ७ लक्ष, ब–हाणपूर ६ लक्ष, हिसोरी ७ लक्ष, समंदर्गा ५ लक्ष, वरवडा ७ लक्ष, सिंदाळवाडी ५ लक्ष असे एकूण २ कोटी ३ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. मंजूर निधीतून त्या त्या गावात स्मशान भूमी शेड उभारणी व परिसर विकास करणे, स्मशान भूमी संरक्षण भिंत बांधकाम करणे, ग्रामपंचायत इमारत बांधकाम करणे, सिमेंट रस्ता, पेव्हर ब्लॉक, नाली बांधकाम, आरो फिल्टर बसविणे यासह विविध कामे केली जाणार आहेत.

सदरील ग्रामपंचायतीला जन सुविधांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत निधी मिळालेल्या त्या त्या गावातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिकांनी समाधान व्यक्त करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# सर्वोच्च न्यायालयातील त्या निंदनीय घटनेचा व्हीएस पँथर्सकडून जाहीर निषेध

लातूर : येथील व्ही एस पँथर्स संघटनेच्या लातूर जिल्हा कार्यकारणीच्या वतीने संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या सूचनेनुसार काल सर्वोच्च न्यायालयामध्ये सरन्यायाधीश माननीय भूषण गवई साहेब यांच्याकडे बूट भिरकावण्याचा प्रयत्न एका मनुवादी मानसिकतेच्या वकिलाने केला तो सुरक्षारक्षकांनी हाणून पाडला . ही घटना अतिशय लाजिरवाणी आहे देशाच्या सर्वोच्च न्याय संस्थेवर हा हल्ला आहे असे आम्ही मानतो याचा जाहीर निषेध व्ही एस पँथर्स च्या वतीने लातूर तहसील कार्यालयासमोर निदर्शने करून तहसीलदार यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली , दोषींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी संपर्क प्रमुख आनंद जाधव,मराठवाडा अध्यक्ष निलेश, जिल्हाध्यक्ष शरद किणीकर ,विधी विभाग जिल्हाध्यक्ष ऍड प्रतिक कांबळे, ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सुर्यवंशी, विद्यार्थी आघाडी







जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, शहराध्यक्ष असद शेख, कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे ,जिल्हाउपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड, जिल्हा संघटक सूरज सूर्यवंशी ,चाकूरतालुका अध्यक्ष अजय वाघमारे, यासिन शेख, अजय राऊत,ऑटो युनियन शहराध्यक्ष शाहरुख मणियार, गौस शेख कामगार आ.शहर अध्यक्ष , सुमित कांबळे ,सोहन कांबळे ,सुरज जोगदंड, संजय सूर्यवंशी ,सौरभ कांबळे, रोहन कांबळे ,अजय गायकवाड ,राजू खान ,रमजान शेख ,अक्षय कांबळे ,जगदीश सरवदे, युनूस शेख , सह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते .

## आदित्य दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ५३९ वृक्षारोपणाचा संकल्प पूर्ण

केज/प्रतिनिधी माऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये केज नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेस कमिटीचे प्रदेश सरचिटणीस व माऊली विद्यापीठ केजचे सचिव आदित्य दादा पाटील यांच्या ३९ व्या वाढदिवसानिमित्त माऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुल परिसरात आज ५३९ वृक्षारोपणाचा संकल्प विविध विद्याशाखा प्रमुखांच्या उपस्थित पूर्ण झाला. माऊली विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे यांच्या नियोजनातून विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले. वृक्षारोपण उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक धनंजय खोसे, सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गौतम पाटील,भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार शिनगारे, रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे एकनाथ गोरे, सरस्वती कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सविता घुले, आदर्श प्राथमिक शाळेचे विलास भिसे, सरस्वती प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नितीन रसाळ यांसह शिक्षक कर्मचाऱ्यांच्या हस्ते



वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते माऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये वृक्षारोपण करण्यात आले व प्रत्येक वृक्षाचे पालकत्व सर्वांनी घेतले . यावेळी डॉ.सौदागर बोलताना म्हणाले की,सचिव आदित्य दादा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण संकुलात सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. यावर्षी सर्वत्र ओला दुष्काळ असल्याने वाढदिवसानिमित्त केवळ समाज उपयोगी उपक्रम घ्यावेत अशा सूचना दिल्यानेच यावर्षी वृक्षारोपण करण्यात आले.

पुढे ते म्हणाले पर्यावरण हे संबंध मानव जातीसाठी समृद्ध असणे काळाची गरज आहे व भविष्याची ती मागणी आहे यासाठी आपण सर्वांनी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. या वृक्षारोपण कार्यक्रमास माऊली विद्यापीठ परिवारातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## आंतरमहाविद्यालयीन 'अ' विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न

मुरूड / महेंद्र आल्टे : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व संभाजी कॉलेज (कला, वाणिज्य व विज्ञान) मुरुड ता. जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन 'अ' विभागीय व्हॉलीबॉल (मुले/मुली) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. बी.एस.(दादा) पटाडे होते. तर उद्घाटक म्हणून डी.डी. एन.एस.एफ.ए. चे चेअरमन मा. दिलिप (दादा) नाडे व समाज जागृती शिक्षण संस्थेचे सचिव मा.ऍड.विजय पाटील यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून समाज जागृती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. डी बी. देवकर, समाज जागृती शिक्षण संस्थेचे संचालक मा. फुलचंद हिंगले, मा. डॉ. महेश बेंबडे आधिसभा सदस्य स्वा. रा.ति.म. नांदेड, मा. प्रा.डॉ.कैलास पाळणे अध्यक्ष क्रीडा अभ्यास मंडळ स्वा.रा.ति.म.नांदेड हे उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू मा. रमेश सहालुगडे, रोहीले सर, मुकम सर, मिलिंद टिळक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष, कार्यक्रमाचे उद्घाटक, प्रमुख पाहुणे व उपस्थितांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. आंतरमहाविद्यालयीन 'अ' विभागीय स्पर्धेत मुलांच्या संघात शिवजागृती महाविद्यालय नळेगाव यांनी प्रथम क्रमांक, दयानंद कला महाविद्यालय लातूर यांनी द्वितीय क्रमांक, शिवनेरी महाविद्यालय शिरूर अनंतपाळ यांनी तृतीय क्रमांक पटकावला तर उत्तेजणार्थ बक्षीस संभाजी कॉलेज मुरुड




यांना देण्यात आले. मुलींच्या संघात दयानंद कला महाविद्यालय लातूर यांनी प्रथम क्रमांक, दयानंद विज्ञान महाविद्यालय लातूर यांनी द्वितीय क्रमांक, दयानंद कॉमर्स कॉलेज लातूर तृतीय क्रमांक पटकावला तर उत्तेजनार्थ बक्षीस संभाजी कॉलेज मुरुड यांना देण्यात आले. सदर स्पर्धा या मा. श्री. दिलीप दादा नाडे पासिंग व्हॉलीबॉल केंद्र (क्रीडांगण) नरसिंह चौक, अष्टविनायक मंदिर शेजारी, मुरुड येथे संपन्न झाल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रिडा विभाग प्रमुख प्रा मधुकर क्षीरसागर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा. डॉ. ए. एस. कानडे यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संभाजी महाविद्यालयाचे क्रिडा विभाग प्रमुख प्रा. मधुकर क्षीरसागर यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## खोटे दस्तऐवज तयार करून शासनाला फसविण्याचा प्रयत्न; तिघांविरुद्ध गुन्हे दाखल - पो.अ. अमोल तांबे

लातूर / प्रतिनिधी :– शासन व पोलिस यंत्रणेला चुकीची माहिती देऊन खोटे दस्तऐवज तयार करून शासनाकडून आर्थिक मोबदला मिळविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही माहिती लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी ७ ऑक्टोंबर रोजी पत्रकार परिषदेत माहिती दिली. प्राप्त माहितीनुसार, बळीराम श्रीपत मुंढे प्रकरणातील खोटी चिठ्ठी ही त्यांचा चुलत भाऊ संभाजी उर्फ धनाजी शिवाजी मुंढे यांनी लिहिल्याचे निष्पन्न झाले आहे. शिवाजी वाल्मिक मेळे प्रकरणातील खोटी चिठ्ठी ही माधव रामराव पिटले यांनी लिहिल्याचे तपासात उघड झाले आहे. अनिल बळीराम राठोड प्रकरणातील खोटी चिठ्ठी ही शिवाजी फत्तू जाधव यांनी नरेंद्र विठ्ठल जक्कलवाड व तानाजी मधुकर जाधव यांच्या संगनमताने तयार केल्याचे निष्पन्न झाले आहे. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधितांनी शासनाला चुकीची माहिती देऊन समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी तसेच शासनाकडून आर्थिक लाभ मिळविण्याच्या हेतूने खोटे दस्तऐवज तयार केले




होते. तपासात असे स्पष्ट झाले आहे की, मृत व्यक्तींच्या नावाने खोट्या चिठ्ठ्या व दस्तऐवज तयार करून ते शासनाकडे सादर करण्यात आले होते. या कृत्यामुळे भारतीय दंड विधानातील कलम ३३६(२),(३), ३४०(२), २९९(१), २९९(२), व ३२१(अ) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नोंदवलेले गुन्हे पुढीलप्रमाणे : १ॅ पोलिस ठाणे अहमदपूर – संभाजी उर्फ धनाजी शिवाजी मुंढे (वय ३८ वर्षे, रा. शिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा क्र. ६६८/२०२४. २ॅ पोलिस ठाणे निलंगा – माधव रामराव पिटले (वय ४३ वर्षे) यांच्याविरुद्ध गुन्हा क्र. ५२५/२०२४. ३ॅ पोलिस ठाणे चाकूर – शिवाजी फत्तू जाधव (वय ५८ वर्षे, रा. हणमंतवाडी तांडा, ता. चाकूर), नरेंद्र विठ्ठल जकनकल्लाव (वय २६ वर्षे, रा. शिंगी), व तानाजी मधुकर जाधव (वय २५ वर्षे, रा. हणमंतवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा क्र. ४३१/२०२४ दाखल करण्यात आला आहे. या सर्व गुन्ह्यांचा तपास संबंधित पोलिस ठाण्यांचे पोलिस निरीक्षक दर्जाचे अधिकारी करीत आहेत.

## मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावली पाहिजे.
## बी. बी. मेश्राम १३६ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, त्रिरत्न बुद्ध विहार व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने त्रिरत्न बुद्ध विहार, सह्याद्री नगर, छ–५, सिडको, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे मला धर्म जास्त प्यार आहे आणि त्यासाठीच मी माझी शक्ती वेचणार आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३६ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा ५ ऑक्टोबर २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आज आपण १३६ व्या कार्यशाळेत चर्चा करीत असताना आपल्या समाजाची स्थिती ३६ च्या आकडया प्रमाणे झालेली आहे. ज्यामुळे एकाच विचारधारेला माणणारे कार्यकर्ते परस्परांचे तोंड पाहायला तयार नाहीत. तरी ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करीत असताना ६९ या इंग्रजी आकड्यातील दोन्ही अंक परस्पराकडे बघून हसताना दिसत आहेत. ती परिस्थिती आपल्या समाजात कधी निर्माण होईल? यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समाज जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असे म्हटल्याचा प्रचार केला जातो. मात्र आपण हे लक्षात घेतले पाहिजे की ९ मार्च १९२४ ला मुंबईच्या दामोदर हॉलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एर्वीलरींश, –सळीरींश रपव जीसरपळीश अर्थात सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा म्हणजे सुशिक्षित झाल्यावर संघटित होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे आणि संघटित झाल्यावर हक्क अधिकारासाठी संघर्ष केला पाहिजे असे म्हटले होते. परंतु आपण तसे न केल्यामुळे आपला समाज संघटित होऊ शकलेला नाही. परिणामी संघर्षाला फारसे यश प्राप्त होत नाही. तसेच शिकल्या सवरलेल्या लोकांनी डॉ. आंबेडकरांना धोका दिला आहे, असेही म्हटले जाते. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तसे म्हटलेले नाही तर १८ मार्च १९५६ ला आग्र्याच्या रामलीला मैदानावर दिलेल्या भाषणात त्यांनी अस्पृश्यांच्या घराघरात ज्ञानगंगेचा प्रवाहने नेणे, सरकारी नोकऱ्यांमध्ये त्यांना व्यापक प्रतिनिधी मिळवून देणे व



खेड्यापाड्यातील अस्पृश्य जनतेची सर्वांगीण सुधारणा करणे हे त्यांच्या मागील पंचवीस वर्षातील राजकारणाचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले होते. याचा प्रचार प्रसार करून शासनकर्ती जमात होण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची आवश्यकता असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेशाप्रमाणे ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टु पॉलिटिक्स चालविण्यासाठी सर्व पक्ष, संघटन, संस्थांनी प्रयत्न केले पाहिजेत. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरच्या श्याम हॉटेलमध्ये मला राजकारणापेक्षा धर्म जास्त प्यारा आहे आणि त्यासाठीच मी माझी सत्ती वेचणार आहे. असे म्हटले होते याची करिता आपण मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावली पाहिजे. याची जाणीव ठेवून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन निरंतरपणे कार्यरत आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका आर. बी. बनसोडे म्हणाल्या की, इतिहासात आपली फार वाईट अवस्था होती. आपली परिस्थिती सुधारण्यासाठी भारताचे संविधानात तरतुदी केलेल्या आहेत, त्याचा आपण लाभ घेतला पाहिजे. शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी आपणास दर्जेदार शिक्षण नाकारले जात आहे, करिता आपण जागृत राहिले पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एस. एस. बोरकर म्हणाले की, धम्मासाठी जीवन समर्पित आणि व्यतीत केले पाहिजे. वर्तमानातील धम्माच्या स्थितीला उपासक जबाबदार आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला आपणास धम्मचक्र प्रवर्तन दिनी धम्माची दीक्षा दिली. त्यांना सारा भारत बौद्धमय करायचा होता. करिता त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा नारा दिला होता. तर शिकलेल्या लोकांनी मला धोका दिलेला आहे असेही म्हटले होते. करिता आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पक्ष संघटन संस्था चालविल्या पाहिजेत.

याप्रसंगी डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, जबाबदार उपासक निर्माण न झाल्याने सर्वत्र धम्माची वाईट स्थिती आहे. बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्याने शिकून तरी काय करायचे? असा विचार करून गरिबा घरची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. मिठूसिंग बहूरे म्हणाले की, बाबासाहेबांना विरोध असताना सुद्धा त्यांनी विपरीत परिस्थितीत कार्य केले आहे. आपण भारताचे संविधानाप्रमाणे समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. रमेश खडसे म्हणाले की खाजगीकरणाच्या विरोधात आंदोलने केली पाहिजेत. महादेव डांबरे म्हणाले की विषय धार्मिक वाटत असला तरी याचा संबंध हा समाज व राजकारणाशी आहे. हे भाषण म्हणजे आयुष्यातील संपूर्ण चळवळीचा सारांश आहे. जी. एस. दोडवे म्हणाले की, आवड असेल, तिथे सवड मिळते. तरी सवड काढून कार्यक्रमाला आले पाहिजे. सत्य स्वीकारण्यासाठी असत्य सोडावे लागेल. डॉ. डी. एन. जाधव म्हणाले की, भारतीय बौद्ध महासभेच्या उद्देशावर आपण कार्य केले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प अर्पण करून त्रिरत्न बुद्ध विहार समितीच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. पंचशील त्रिसरणाने सुरुवात करण्यात आली. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक डॉ. रमेशचंद्र धनेगावकर व आभार महादेव डांबरे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, मिठूसिंग बहूरे, डॉ. रमेशचंद्र धनेगावकर, महादेव डांबरे, जे. बी. हातोले, के. पी. आढाव, आर. बी. बनसोडे, कल्पना अवचरमल, चंद्रकांत मस्के, रमेश खडसे, जी. एस. दोडवे, एस. एस. बोरकर, डॉ. डी. एन. जाधव, व्ही. टी. शिरसाट, प्रा. श्रीमंत कांबळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

## करुणा सेवा ट्रस्टने दिला पूरग्रस्त भागातील कुटुंबाला मदतीचा हात



केज/प्रतिनिधी मागील महिन्यापासून मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला त्यामुळे मराठवाड्यातील जनजीवन विस्कळीत झाले होते. पुराच्या पाण्याने शेती पिकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.अनेकांच्या घरात पाणी शिरल्यामुळे नागरिक हतबल झाले होते त्यांना मदतीचा हात म्हणून मुंबई येथील करुणा सेवा ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून उदय चांदाराना यांच्या सहकार्याने बीड धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देत जीवनावश्यक वस्तू व किराणा मालाचे वाटप करण्यात आले.

संकटात सापडलेल्या पूरग्रस्त भागातील कुटुंबांना आधार देण्याचे समाजभान राखत मुंबई येथील युवा उद्योजक प्रशांत गाडे यांच्या माध्यमातून बीड,धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात ब्लँकेट,चादरी, अन्न धान्य, तेल, बिस्किटे, फरसाण ,चटणी,व अन्य गृहउपयोगी वस्तू ,औषधे, खाद्य पदार्थ वाटप करण्यात आले. यावेळी शिवप्रसाद ठोंबरे, अभिषेक भिसे,राहुल ठोंबरे,बप्पा भिसे,प्रदीप ठोंबरे,पोपट लांडगे,राजाभाऊ इटकर,शेळके अण्णा, आकाश फरके, प्रवीण खोडसे,मारुती नवगण, पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होता.

## वंचित च्या कामगार मेळाव्या नंतर ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतली दिवंगत : अनुष्का केळवे कुटुंबाची भेट

नवी मुंबई / के. एच. हनवते :– ऐरोलीतील सुशीला देवी ( एस. डी. वी.) शाळेत दिनांक : ३ ऑक्टोबर रोजी दहावी च्या सराव परीक्षेत शेजारच्या विद्यार्थ्याने दिवंगत: अनुष्का शहाजी केवळे या विद्यार्थिनी जवळ कोणीतरी कागदाचा गोळा फेकल्याने कॉपी केल्याच्या आरोपावरून शिक्षकांकडून अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे अनुष्काने गळाफास घेऊन जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना रबाळे नोसिलनाका येथे घडली आणि केवळे कुटुंबियांवर ऐन सणासुदीच्या काळात दु:खाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेची माहिती वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय अध्यक्ष : ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांना कार्यकर्त्यां कडून कळताच दिनांक : ६ ऑक्टोबर रोजी वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृह येथील कामगार मेळाव्याला हजारोंच्या संख्येने उपस्थित असणाऱ्या




कामगारांना व वंचित बहुजन आघाडीचे आजी माजी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केल्यानंतर ॲड. प्रकाश



तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी केळवे कुटुंबियांची सांत्वन पर भेट घेतली व विचारपूस केली. यावेळी वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सर्वजित बनसोडे, ॲड. उत्कर्षा रूपवते, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष: अश्वजीत जगताप, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष: शिल्पा रणदिवे, रिपब्लिकन सेनेचे माजी विधानसभा अध्यक्ष प्रकाश वानखेडे, युवा नेते सुनील वानखेडे आदिसह महिला पदाधिकारी, समता सैनिक दल, भारतीय बोद्ध महासभा व वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन कार्यकर्ते तसेच प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या घटनेमुळे एस. डी. वी. शाळेच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवण्यात आले आहे स्थानिक पोलीस प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांना कडून केली जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE